# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur.dte@gmail.com

क्रमांक :- तंशिसं/विकाना/शैवि-३/प्रवेश प्रक्रिया/२०१५/ 3/3
दिनांक :- 8 OCT 2015

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय, शासन अनुदानित, स्वायत्त संस्था व
विद्यापीठ नियंत्रित संस्था नागपूर विभाग, नागपूर.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये विविध अभ्यासक्रमाच्या शिल्लक जागांकरीता संस्थास्तरावरील प्रवेश फेरीचे आयोजन केल्याबाबतची माहिती.

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा,मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/ २०१५/१६८५, दि. ३०.०९.२०१५.

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील विविध अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पार पडली आहे. आपले संस्थांमध्ये केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तिसऱ्या प्रवेश फेरीनंतर (कौन्सिलिंग राऊंड) शिल्लक राहिलेल्या जागा संचालनालयाच्या वतीने अतिरिक्त प्रवेश फेरी घेऊन भरण्यांत आल्या होत्या. या अतिरिक्त फेरीनंतरही जागा रिक्त राहिल्यास संबंधित संस्थाप्रमुखांनी प्रवेशासाठी उपलब्ध जागा संस्थेच्या नोटीस बोर्डवर/संकेतस्थळावर/वृत्तपत्रात प्रदर्शित करुन या जागांवर प्रवेश करण्याबाबत संचालनालयाने विविध अधिसुचनाव्दारे स्पष्ट केले होते. त्यानुसार आपले संस्थांनी अतिरिक्त प्रवेश फेरीनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील प्रवेशासाठी संस्थास्तरावर प्रवेश फेरी आयोजित केली होती काय याची माहिती संचालनालयास त्वरीत सादर करावयाची असल्याने तसेच जागा रिक्त असूनही अशी प्रवेश फेरी घेतली नसल्यास ही अत्यंत गंभीर बाब असून त्याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवलेली आहेत अशा संस्थेच्या प्राचार्यांचा अहवाल या कार्यालयास त्वरीत सादर करण्यांत यावा, जेणेकरुन सदरहू माहिती संचालनालयास पाठविणे सोईचे होईल.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत - मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.,मुंबई (का. क्र. २अ) यांना संदर्भिय पत्रान्वये माहितीकरीता सविनय सादर.